महाराष्ट्र शासन
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
(लेखा शाखा)
**ई-मेल:-** dcg.aurangabad@gmail.com **दूरध्वनी क्र** 0240-2351311

---

## जाहीर सुचना

जा.क्र २०२५/साप्र/लेखा-४/ Water Dispenser/प्र.क. दिनांक :९/०४/२०२५.

**विषय :_विभागीय आयुक्त कार्यालयात Water Dispenser खरेदीकरीता दरपत्रके मागविणे बाबत.**

विभागीय आयुक्त कार्यालयातील प्रशासकीय इमारतीतील पहिला, दुसरा व तिसरा मजला व अन्य ठिकणी येथे अभ्यागतांसाठी पिण्याच्या पाण्याचे Water Dispenser लावणेसाठी (०५ नग) खरेदी करणे आवश्यक आहे.

खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या कामाच्या अनुषंगाने सेवापुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ,क्र | बाब | एकूण नग | प्रति नग दर (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | Water Dispenser | ०५ | |

- **Water Dispenser हयात खालील विशिष्टता असणे आवश्यक आहे.**

१. पाणी शुध्दीकरण करणारे असावे.
२. गरम, थंड व साधे पाण्याचे असावे.
३. २० लिटरचा जार बसला पाहीजे
४. चांगल्या कंपनीचा (ISO Trademark) असावा.
५. जास्तीत जास्त वॉरंटीचा असावा.
६. फ्रिज नसला पाहिजे.

टिप- १. उपरोक्त विवरणपत्रात दरपत्रक हे संस्थेचे /आस्थापनाचे लेटरहेडवर सादर करणे.

२. उपरोक्त अटी पुर्ण करण्या-या दरपत्रकदारांचा यांचा विचार करण्यात येईल अन्यथा सदर दरपत्रक अपात्र करण्यात येईल.

**दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे जोडावीत—**

१. दरपत्रकधारकाची / निविदाधारकाची माहितीबाबतचे विवरण पत्र सोबत संलग्न केले आहे.
२. दुकाने व संस्था अधिनियम 1947 अन्वये शॉप ॲक्ट लाइसन्स / संस्थेचे /आस्थापना /नोंदणी प्रमाणपत्राची अद्यावत प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
३. आधार कार्डची छायांकित प्रत.
४. पॅन कार्डची छायांकित प्रत
५. GST वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्राची (Certificate of Registration) छायांकित प्रत
६. सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे निविदा / दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र/हमीपत्र, सोबत संलग्न केले आहे

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ०६ ही सर्व कागदपत्रे स्वयंसाक्षांकित ( self attested ) करुन लिफाफा मध्ये सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व परवान्यांचे दरपत्रकाच्या कालावधीपर्यंत नुतनीकरण असणे आवश्यक राहील.

वरीलपैकी सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती दरपत्रक उघडतेवेळी, सोबत ठेवणे व कोणत्याही कागदपत्राच्या मुळ प्रतीची मागणी या कार्यालयाकडून कोणत्याही वेळी करण्यात आल्यास, त्या सादर करणे बंधनकारक राहील.

आपल्याकडील दरपत्रके वरील कागदपत्रासह या कार्यालयास दिनांक-९/०४/२०२५ ते १५/०४/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा पर्यंत या कार्यालयाचे लेखाशाखेमध्ये सादर करावेत. उशिरा प्राप्त झालेल्या किंवा अपूर्ण दरपत्रके यांचा विचार करण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी विहीत दिनांकास व विहीत वेळेपर्यंत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक-१६/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वा अपर आयुक्त (साप्र) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे कक्षामध्ये सर्व उपस्थितांसमक्ष उघडण्यात येतील. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारारण्याचा अधिकार मा. विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांनी राखुन ठेवले आहेत.

**(मा. अपर आयुक्त (साप्र) यांच्या टिपणी मान्यतेने)**

**(अरुण मावंडे)**
**प्र.तहसीलदार (सा.प्र)**
**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर, विभाग.**

<u>खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार हमीपत्र आस्थापनेच्या /संस्थेच्या लेटरहेडवर  देण्यात यावे.</u>

**<u>एकच दरपत्रक सादर करत असलेबाबत, निविदाधारकांचे कंपनीस /संस्थेस यांनी काळया यादीत टाकलेले नाही, कागदपत्रांच्या सत्यतेबाबत, ई-निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत</u>**

**<u>प्रतिज्ञापत्र / हमीपत्र</u>**

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर  कार्यालयाच्या इमारतीत Water Dispenser खरेदीकरीता मी दरपत्रक दाखल करीत असून खालील प्रमाणे हमी देत आहे.

मी एकापेक्षा अधिक संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक नाही, असल्यास मी ज्या संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक आहे त्यासंस्थेपैकी एकाच संस्थेमार्फत मी एकच दरपत्रक सादर करीत आहे.

तसेच माझ्या कंपनीस/संस्थेस राज्य तसेच केंद्र शासकीय/निमशासकीय/ पिण्याचे पाणी  पुरवठादारांच्या काळ्या यादीत टाकलेले नाही असे मी प्रमाणित करीत आहे.

मला पूर्ण कल्पना आहे की, मी सादर केलेले दरपत्रक मंजूर झाल्यास कार्यालयात Water Dispenser गुणवत्तेनुसार पुरवठा करेन उक्त निविदेच्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास भारतीय न्याय दंड संहितेतील संबंधित कलमान्वये मी शिक्षेस पात्र राहील. तसेच मी सादर केलेली निविदा अवैध ठरेल याची मला जाणीव आहे.

मी निविदेतील अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या आहेत. सदर अटी व शर्ती मला मान्य असून त्यांच्या अधिन राहून मी सदर दरपत्रक सादर करीत आहे.

वरील सर्व माहिती खरी व सत्य असून यामध्ये काही असत्यता आढळून आल्यास माझी कंपनी/संस्था ही दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

दिनांक :

नाव : ------------------------------

पत्ता : ------------------------------

------------------------------.

भ्रमणध्वनी क्र. ----------------------

**विभागीय आयुक्त कार्यालयाच्या इमारतीत पिण्याच्या पाण्याचे Water Dispenser लावणेसाठी दरपत्रकधारकाची माहिती बाबतचे विवरण**

| अ .क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | निविदा /दरपत्रकधारकाचे आस्थापना / संस्थेचे नाव व पत्ता | |
| २. | निविदा /दरपत्रकधारका चे पुर्ण नाव व ह. रहिवासी पत्ता | |
| ३. | आस्थापना पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक मोबाईल क्रमांक व ईमेल | |
| ४. | शॉपअॅक्ट लायसन्स/आस्थापना/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ५. | आधारकार्ड क्रमांक (छायांकित प्रत सोबत जोडणे) | |
| ६. | पॅन कार्ड क्रमांक (छायांकित प्रत सोबत जोडणे) | |
| ७. | सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबात व काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, पिण्याचे पाणी पातळी TDS गुणवत्तेनुसार पुरवठा प्रतिज्ञापत्र | |

१.

२. स्थळ

शिक्का

३. दिनांक-

निविदा / दरपत्रकधारकाची सही व